# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/नियोजन/२५६/२०२१ पिंपरी चिंचवड शहर दिनांक-२८/०६/२०२१

देहुरोड वाहतूक विभाग हद्दीतील देहुरोड भागात देहुरोड बाजार येथुन पुणे बाजुकडे जाणारा सर्व्हीस रोड तसेच मुंबई पुणे जुना हायवे ते नविन रेल्वे ब्रिज यांना जोडणारे अंदाजे ५० मीटर एप्रोच रॅंप चे तसेच रिटेनिंग वॉल चे काम करण्याचे नियोजित आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सुधीर हिरेमठ (भा.पो.से), पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

### देहुरोड-तळेगाव वाहतूक विभाग

१) देहुरोड सवाना चौकातुन निगडी कडे जाणारा सर्व्हीस रोड सर्व वाहनांकरीता बंद करण्यात येणार आहे.

पर्यायी मार्ग :- सवाना चौक - आधार हॉस्पीटल- स्वामी चौक- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पीटल- सेन्ट ज्युड स्कुल पंचर समोरुन वळुन गुरुद्वारा समोरुन जुना मुंबई पुणे हायवे उड्डानपुलावरुन निगडी बाजुकडे वळविण्यात येणार आहे.

वरील आदेश दि.२८/६/२०२१ पासुन ११/०८/२०२१ या कालावधी करीता वैध राहील.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.
३) पोलीस निरीक्षक देहुरोड वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.
४) मे टी ॲन्ड टी इन्फ्रा. प्रा.लि.
२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

देहूरोड येथे नविन रेल्वे उड्डाणपुलाचे रॅम्प बांधणेकरीता वाहतुक वळन नकाशा

